# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 08.06.2024** **वारः शनिवार**

---

**ठळक बातम्या**

1) **पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार, उद्या संध्याकाळी होणार शपथविधी.**
2) **२) आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदासाठी तेलुगू देसम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू येत्या बुधवारी 12 जूनला शपथ घेणार.**
3) **छत्तीसगडमध्ये बस्तर विभागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सात माओवादी ठार.**
4) **मुंबई आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला 15 जूनपासून सुरुवात.**

**आणि**

5) **माध्यमक्षेत्रातले ज्येष्ठ उद्योजक रामोजी राव कालवश.**

**पंतप्रधान दावा**

काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन सरकारस्थापनेचा दावा सादर केला. नवीन सरकारचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे रविवारी संध्याकाळी होणार आहे. राष्ट्रपती संध्याकाळी सव्वासात वाजता नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. तत्पूर्वी राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएच्या शिष्टमंडळानं राष्ट्रपतींची भेट घेऊन मोदी यांची भाजपा संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचं पत्र सादर केलं. एनडीएच्या सदस्य पक्षांच्या पाठिंब्याचं पत्रही राष्ट्रपतींना देण्यात आलं. राष्ट्रपती भवनाच्या बाहेर बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, की राष्ट्रीय लोकशाही आघाडी एक स्थिर, ताकदीचं आणि विकासाभिमुख सरकार चालवेल. राष्ट्रपतींनी आपल्याला काळजीवाहू पंतप्रधान म्हणून नेमल्याचं त्यांनी सांगितलं आणि शपथविधी समारंभ रविवारी घेण्यास आपल्या आघाडीची हरकत नसल्याचं राष्ट्रपतींना कळवल्याचं त्यांनी नमूद केलं. दरम्यान, राज्यघटनेच्या कलम ७५-१नं दिलेल्या अधिकारांनुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान म्हणून निवड केल्याचं राष्ट्रपती भवनानं समाजमाध्यमांद्वारे दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रपतींनी मोदी यांना केंद्रीय मंत्रिमंडळ सदस्यांची यादी देण्याची विनंती केल्याचंही त्यात नमूद करण्यात आलं आहे. तत्पूर्वी एनडीए संसदीय पक्षाच्या नेतेपदी भाजपाचे नेते, नरेंद्र मोदी यांची निवड करण्यात आली. काल दुपारी एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक, नवी दिल्लीत जुन्या संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. त्यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथसिंह यांनी, एनडीएच्या संसदीय पक्ष नेतेपदी मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला एनडीएच्या सर्व सदस्य पक्षांनी एकमतानं अनुमोदन दिलं. मोदी यांची लोकसभेतील भाजपाचे नेते आणि भाजपा संसदीय पक्षाचे नेते म्हणूनही निवड करण्यात आली.

**चंद्राबाबू नायडू**

तेलुगू देसम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू येत्या बुधवारी 12 जूनला आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. सकाळी अकराच्या सुमारास विजयवाडाजवळ हा शपथविधी

सोहळा होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच एनडीएचे वरिष्ठ नेते आणि आंध्र प्रदेशच्या शेजारील राज्यांचे मुख्यमंत्री या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. 2014 मध्ये राज्याचं विभाजन झाल्यानंतर नायडू आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याची ही दुसरी वेळ असेल. तेलगू देसम पक्ष, जनसेना आणि भारतीय जनता पक्षानं आंध्र प्रदेश विधानसभेच्या 175 पैकी 164 जागांवर विजय मिळवत विधानसभा निवडणुकीत बाजी मारली आहे.

**निवडणूक आयुक्त**

लोकसभा निवडणुकीदरम्यान जबाबदारी काळजीपूर्वक आणि अचूकपणे पार पाडल्याबद्दल मुख्य निवडणूक अधिकारी राजीवकुमार यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांचं कौतुक केलं आहे. या अधिकाऱ्यांनी फक्त निवडणूक आयोगाचा विश्वास सार्थ ठरवला नाही, तर या संस्थेची प्रतिष्ठाही वाढवली, असं त्यांनी म्हटलं आहे. राजीवकुमार यांनी सर्व जिल्हाधिकारी, उपायुक्त, निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना एक पत्र लिहिलं आहे. या अधिकाऱ्यांनी त्यांना आलेली आव्हानं, प्रतिक्रिया आणि यशकथा नोंदवून ठेवाव्यात असं आवाहनही त्यांनी या पत्रात केलं आहे. या अधिकाऱ्यांनी आयोगाचं कौतुक आणि आभार त्या त्या जिल्ह्यातील सर्व यंत्रणांपर्यंत पोचवावेत अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**छत्तीसगड चकमक**

छत्तीसगडमध्ये बस्तर विभागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत काल सात माओवादी ठार झाले. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवर ही चकमक झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.या माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतल्याचं दंतेवाडाचे पोलिस अधीक्षक गौरव राय यांनी आकाशवाणीला सांगितलं आहे. गुप्तचर सूत्रांकडून माहिती मिळाल्यानंतर, जिल्हा राखीव रक्षक दल आणि इंडो -तिबेटियन सीमा पोलिसांच्या संयुक्त पथकानं शोध मोहिमेला सुरुवात केली होती. त्यावेळी ही चकमक झाली. या कारवाईत तीन जवानही जखमी झाले आहेत.

**लिबिया मृतदेह**

लिबियाच्या किनाऱ्यानजीक ११ स्थलांतरितांचे मृतदेह काल मदत नौकांना मिळाले आहेत. डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स या संस्थेच्या मदत नौकांनी १६० स्थलांतरितांना बोटींमधून सुखरूप बाहेर काढलं आहे. दोन स्वतंत्र नौकांद्वारे या स्थलांतरितांची सुटका करण्यात आली. समुद्रात मृतदेह तरंगत असल्याचं एका जहाजातून दिसल्यानंतर ते बाहेर काढण्यात आले. २०१४नंतर या भागात सुमारे वीस हजार जणांचा मृत्यू झाल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**मस्क**

टेस्ला आणि स्पेसएक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी उद्योजक एलन मस्क यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदासाठी पुन्हा निवड झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केले आहे.आपल्या समाजमध्यमावरील संदेशात मस्क यांनी म्हटलं आहे की, त्यांच्या कंपन्या लवकरच भारतात गुंतवणूक करण्याचा विचार करत आहेत.टेस्ला कंपनी भारतात उत्पादन प्रकल्प सुरू करणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणार आहे.

**रिझर्व्ह बँक**

रिझर्व्ह बँकेनं सलग आठव्या वेळा रेपो दर साडेसहा टक्क्यांवर स्थिर ठेवले आहेत. काल जाहीर झालेल्या पतधोरण आढाव्यात स्टँडिंग डिपॉझिट दर सव्वासहा टक्के आणि मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी दर पावणेसात टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आला आहे. गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी काल याबाबत घोषणा केली. चलनवाढीचा दर आणि विकास यांच्यातील संतुलन योग्य असल्याचं नमूद करून ते म्हणाले, की मोसमी पाऊस चांगला होण्याच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर खाद्यपदार्थांच्या चलनवाढीच्या दरांतल्या वाढीकडे पतधोरण समितीचं लक्ष असल्याचं त्यांनी नमूद केलं. वर्तमान आर्थिक वर्षात विकास दराचा अंदाज रिझर्व्ह बँकेनं सात टक्क्यांवरून सात पूर्णांक दोन दशांश टक्के इतका वाढवला आहे.

**मिफ-मुंबई**

अठरावा मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव येत्या १५ ते २१ जून दरम्यान होणार आहे. या महोत्सवात ५९ देशांचे ३१४ चित्रपट प्रदर्शित केले जातील. “अमृतकाळातला भारत” ही, यंदाच्या या महोत्सवाची विशेष संकल्पना आहे, असं, माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं. हा महोत्सव मुंबईत होणार असला तरी पुण्यासह दिल्ली, चेन्नई, आणि कोलकातामध्ये चित्रपटांचं प्रदर्शन केलं जाईल. विविध देशांचे सतरा चित्रपट, तसंच तज्ञांचे परिसंवादही या महोत्सवात होणार आहेत.

**ई-पथकर**

राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना अडथळामुक्त पथकर संकलन सेवेचा लाभ घेता यावा यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं सध्या वापरात असलेल्या फास्टॅग यंत्रणेसोबतच नवीन उपग्रहावर आधारित दिशादर्शक प्रणाली कार्यान्वित करण्याची योजना आखली आहे. त्यासाठी प्राधिकरणानं देशभरात जागतिक दिशादर्शक उपग्रह प्रणालीवर आधारित इलेक्ट्रॉनिक पथकर संकलन प्रणाली विकसित करण्यासाठी आणि लागू करण्यासाठी जागतिकस्तरावरील कंपन्यांकडून स्वारस्य प्रस्ताव मागवले आहेत.

**योग**

योगाभ्यासाच्या फायद्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रक्रमांचं आयोजन माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे करण्यात येईल, असं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी सांगितलं. आयुष सचिव वैद्य राजेश कोटेचा यांच्यासह संजय जाजू यांनी काल नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उपक्रमांच्या तयारीचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. प्रसार भारती दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या देशव्यापी जाळयाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्तानं विविध कार्यक्रम प्रसारित करणार असून यामध्ये योग तज्ञांच्या मुलाखती आणि योग प्रात्यक्षिकांचं थेट प्रसारण देखील प्रसारित करणार आहे. मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेच्या सहकार्यानं योगाला जीवनपद्धती म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी आणि लोकांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी एक विशेष कार्यक्रमसुद्धा आकाशवाणी प्रसारित करेल. याशिवाय आयुष मंत्रालयानं एक योग गीत तयार केलं असून लवकरच ते सर्व माध्यमांसाठी उपलब्ध करून दिलं जाईल, असं प्रसारण मंत्रालयानं सांगितलं आहे.

**एफआयएच हॉकी**

लंडनमध्ये सुरू असलेल्या एफआयएच हॉकी प्रो लीगमध्ये भारताचा सामना आज जर्मनीशी होणार आहे. यापूर्वी झालेल्या सामन्यात भारतानं जर्मनीचा 3-0 असा पराभव केला होता. भारतीय संघाच्या आतापर्यंतच्या कामगिरीबद्दल बोलताना उपकर्णधार हार्दिक सिंग म्हणाला की, सर्व खेळाडूंनी खेळाचं चांगलं प्रदर्शन केलं आहे, मात्र अजूनही काही बाबतीत सुधारणा करणं आवश्यक आहे.उर्वरित सामन्यांमध्ये आक्रमकपणे सुरुवात करणं आणि सर्वोत्तम संयोजन हा भारतीय संघाचा उद्देश असेल असंही हार्दिक सिंग म्हणाला. 14 सामन्यांतून 24 गुणांची कमाई केली असल्यामुळं भारतीय पुरुष संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.

**रामोजी राव निधन**

ज्येष्ठ माध्यम उद्योजक रामोजी राव यांचं आज सकाळी हैदराबादमध्ये निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्यानं हैदराबादमधील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथंच त्यांचं निधन झालं. ईटीव्ही नेटवर्क आणि रामोजी फिल्मसिटीचे रामोजी राव प्रमुख होते. तेलगू माध्यम क्षेत्रात त्यांनी मोठं योगदान दिलं. त्यांनी उषाकिरण मूव्हीज या कंपनीच्या मार्फत विविध चित्रपटांचीही निर्मिती केली होती.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**